
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 SEP 2019
तरुण भारत

# तृतीयपंथीयांच्या हक्कासाठी विद्यापीठ कटिबद्ध

## प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : बृहतआराखड्यात तृतीयपंथीयांसाठी विविध उपक्रम

प्रतिनिधी
कोल्हापूर

समाजातील प्रत्येक घटकाला शैक्षणिक सेवा पुरवणे ही विद्यापीठाची जबाबदारी आहे. शिक्षणासह सामाजिक हक्कांपासून तृतीयपंथीय नागरिक वंचित राहणार नाहीत, यासाठी प्रयत्न करण्यास शिवाजी विद्यापीठ कटिबद्ध आहे, अशी ग्वाही शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी येथे दिली. कार्यशाळेसाठी कोल्हापूर परिसरातील बहुसंख्य तृतीयपंथी नागरिक उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे तृतीयपंथीयांसाठी आयोजित कौशल्य विकास कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, व्यासपीठावर (डावीकडून) विशाल पिंजानी, मयुरी आळवेकर, डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव.

विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे तृतीयपंथीयांसाठी आयोजित कौशल्य विकास कार्यशाळेमध्ये ते बोलत होते. यावेळी अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, कौशल्य विकास अधिकारी महेश चव्हाण, मैत्री फौंडेशनच्या अध्यक्ष मयुरी आळवेकर आणि विशाल पिंजानी उपस्थित होते.

डॉ. शिर्के यावेळी म्हणाले, अशी कार्यशाळा विद्यापीठात प्रथमच होत असून तृतीयपंथीयांमधील कौशल्य विकासासाठी सुरू झालेला हा उपक्रम पुढील काळातही निरंतर, व्यापक स्वरूपात विद्यापीठ राबवेल. त्यांना सर्वांनी समतेची वागणूक दिली पाहिजे ही आपली सार्वजनिक जबाबदारी आहे. विद्यापीठाच्या बृहत-आराखड्यामध्ये तृतीयपंथीयांसाठी विविध उपक्रम राबविण्यासाठीही तरतूद केल्याची माहिती दिली.

तृतीयपंथीयांचे प्रश्न विद्यापीठ समजावून घेत आहे आणि त्यावर उपाययोजना करण्यासाठी, दिलासा देण्यासाठी विद्यापीठ पुढे आले आहे, ही अत्यंत स्तुत्य बाब आहे, असे मयुरी आळवेकर म्हणाल्या.

कार्यशाळेत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह आंतरराष्ट्रीय व्याख्याते कौस्तुभ बंकापुरे, डॉ. विद्यानंद खंडागळे, डॉ. कृष्णा पाटील, पद्मश्री मादनाईक, डॉ. ए. एम. गुरव यांनी विविध विषयांवर कौशल्य प्रशिक्षण दिले.



युवा महोत्सवातील सांघिक व वैयक्तिक सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते स्वीकारताना फलटणच्या मुधोजी महाविद्यालयाचे विद्यार्थी.

# युवा महोत्सवावर 'मुधोजी'ची मोहर

म. टा. वृत्तसेवा, आजरा

शिवाजी विद्यापीठाच्या ३९ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात सांघिक आणि वैयक्तिक आणि सर्वसाधारण विजेतेपदावर फलटणच्या मुधोजी महाविद्यालयाने आपली मोहोर उमटवली. त्याचबरोबर प्रतिष्ठेच्या लोकनृत्यात 'मुधोजी', तर लोककलेत वाईच्या किसनवीर महाविद्यालयाने बाजी मारली. शिवाजी विद्यापीठ व मुधोजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने २६ ते २९ सप्टेंबर दरम्यान हा महोत्सव आयोजित केला होता.

पारितोषिक वितरण कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, तर अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य विश्वासराव देशमुख होते. कोल्हापूर विभागीय सहसंचालक डॉ. अजय साळी, डॉ. आर. व्ही. गुरव, अरविंद निकम, प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड आदी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'युवा महोत्सव काहींना पारितोषिकांनी, तर काहींना अनुभवाने संपन्न करतात. यातून दोघांच्याही आयुष्याचे सोने होईल. कलागुणांना अंतर न देता, त्यास व्यापक रूप द्या. कौशल्य म्हणून विकसित करा. त्यातून तुमचा स्वतःचा आणि पर्यायाने देशाचाही विकास होईल.' डॉ. अजय गायकवाड यांनी स्वागत केले. डॉ. डी. पी. शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 SEP 2019
तरुण भारत


# राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास

## उपकुलसचिव प्रा. डॉ.पी. एस. पांडव: न्यू कॉलेजमध्ये स्वयंसेवकांची उपस्थिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वात बदल होऊन सर्वांगीण विकास होतो. त्यांच्यामध्ये सामाजिक बांधिलकी जोपासण्याची भावना रुजवण्यास मदत होते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव प्रा. डॉ. पी. एस. पांडव यांनी केले. न्यू कॉलेजमध्ये आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेमुळेच विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांचा विकास होतो. ज्युनिअर विभागाचे प्रकल्प अधिकारी प्रा. आर.एस.किरुळकर यांनी आभार मानले. उपप्राचार्य प्रा. टी. के. सरगर, सिनिअर प्रकल्प अधिकारी चैत्रा राजाज्ञा, डॉ. एम. बी. वाघमारे आदींसह ज्युनिअर व सिनिअर विभागाचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**कोल्हापूर : न्यू कॉलेजमध्ये झालेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमात बोलताना प्रा. डॉ. पी. एस. पांडव, सोबत प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील आदी मान्यवर उपस्थित.**

29 SEP 2019
लोकमत
...संपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, को...

रविवार
दि. २९ सप्टेंबर २०१९
लोकमत ५ प्रादेशिक
www.lokmat.com




फलटण येथे आयोजित मध्यवर्ती युवा महोत्सवात संगीत व नृत्य विभागातील चषक कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते कोल्हापूर येथील विवेकानंद कॉलेजला प्रदान करण्यात आला.

# आनंदी जीवनासाठी कला जोपासा : शिंदे

**फलटण** : सामाजिक प्रश्न, जाणिवा जागृत करण्याचे प्रभावी काम या युवा महोत्सवातून होते. विद्यार्थ्यांनी आपल्या कलेचं कौशल्यात रुपांतर केले पाहिजे. कलागुणांची सोबत असेल तर जीवन आनंदी जगणे शक्य होते. यासाठी कलेची जोपासना करा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

येथील मुधोजी महाविद्यालयात आयोजित ३९ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या बक्षीस समारंभप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी




प्राचार्य विश्वासराव देशमुख होते, तर उच्च शिक्षणचे विभागीय सहसंचालक, डॉ. अजय साळी, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. आर. जी. कोरबू, सुलक्षणा कुलकर्णी, डॉ. सुधीर इंगळे, डॉ. पी. के. करेकट्टी, सी. यु. माने, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. पार्श्वनाथ राजवैद्य, संयोजन समिती सचिव डॉ. टी. पी. पाटील उपस्थित होते. प्राचार्य ए. आर. गायकवाड यांनी स्वागत, तर डॉ. अशोक शिंदे, डॉ. नितीन धवडे यांनी सूत्रसंचालन केले. संयोजन समितीचे सचिव डॉ. टी. पी. शिंदे यांनी आभार मानले.

# युवा महोत्सवात मुधोजी महाविद्यालयाची बाजी

## वैयक्तिक, सांघिक चषकांचे मानकरी । 'विवेकानंद'चे वर्चस्व, भारतीय समूहगीत, लघुनाटिका, रांगोळीत प्रथम, भारती विद्यापीठ एकांकिकेत प्रथम

आयुब मुल्ला ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**फलटण** : अत्यंत चुरशीने झालेल्या मध्यवर्ती युवा महोत्सवात कलाविष्कारात आघाडी घेत फलटण येथील मुधोजी महाविद्यालयाने वैयक्तिक व सांघिक अशा दोन्ही गटांत बाजी मारत सर्वसाधारण अजिंक्यपद पटकाविले. त्यांना अनुक्रमे कुलगुरु डॉ. अप्पासाहेब पवार व अभिजितदादा कदम फिरते चषक प्रदान करण्यात आले. त्यापाठोपाठ कोल्हापूरच्या विवेकानंद महाविद्यालयाने विविध स्पर्धांत वर्चस्व ठेवून बक्षिसे मिळविली. सरदार बाबासाहेब माने लोककला फिरता चषक किसनवीर महाविद्यालय (वाई, जि. सातारा) यांनी पटकाविला, तर याच नावाचा लोकनृत्य चषक मुधोजी महाविद्यालयाच्या संघाने पटकाविला. मुधोजी महाविद्यालय व विवेकानंद महाविद्यालय यांच्यात सर्वसाधारण अजिंक्यपदासाठी चुरस झाली. मात्र, यात मुधोजी महाविद्यालयाने युवा महोत्सवात 'लय भारी' बाजी मारली.

विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी फिरते चषक विभागनिहाय मिळविलेल्या कॉलेजची नावे अशी - नृत्यविभाग - विवेकानंद महाविद्यालय, नाट्यविभाग - मुधोजी महाविद्यालय, यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (सातारा). संगीत विभाग - विवेकानंद कॉलेज, कला विभाग - मुधोजी महाविद्यालय, वाङ्मय विभाग - सर्व अधिविभाग संघ शिवाजी विद्यापीठ व शंकरराव जगताप आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज (वाघोली).

अनुक्रमे निकाल असा - **सुगम गायन** - मातोश्री बयाबाई कदम कन्या महाविद्यालय (कडेगाव), विवेकानंद कॉलेज, वेणूताई चव्हाण कॉलेज, (कऱ्हाड). **भारतीय समूहगीत** - विवेकानंद कॉलेज, राजाराम महाविद्यालय कोल्हापूर, कदम कन्या महाविद्यालय कडेगाव.

**एकांकिका** - भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, मुधोजी महाविद्यालय, वसंतदादा पाटील कॉलेज तासगाव. **लघुनाटिका** - विवेकानंद कॉलेज, यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, सातारा, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर. **पथनाट्य** : दूधसाखर महाविद्यालय, बिद्री, मुधोजी महाविद्यालय, यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा. **नकला** - सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज कऱ्हाड, आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कोवाड, कदम कन्या महाविद्यालय कडेगाव.

**शास्त्रीय गायन** - सर्व अधिविभाग संघ शिवाजी विद्यापीठ, वेणूताई चव्हाण कॉलेज, कऱ्हाड. **लोकनृत्य** - मुधोजी महाविद्यालय, विवेकानंद कॉलेज, वाय. सी. कॉलेज इस्लामपूर. **लोककला** - किसनवीर महाविद्यालय, वाई, महावीर महाविद्यालय कोल्हापूर, पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली. **शास्त्रीय नृत्य** : न्यू लॉ कॉलेज कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज, सर्व अधिविभाग संघ शिवाजी विद्यापीठ.

**वक्तृत्व** : नाईक महाविद्यालय शिराळा, राजाराम महाविद्यालय, डी. पी. भोसले कॉलेज कोरेगाव. **वादविवाद** - मुधोजी कॉलेज, जगताप कॉलेज वाघोली, दूधसाखर महाविद्यालय बिद्री. **प्रश्नमंजूषा** : राजाराम कॉलेज कोल्हापूर, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा, विलिंग्डन कॉलेज, सांगली, यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा.

**सूरवाद्य** - नानासाहेब महाडिक कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पेठनाका, विवेकानंद कॉलेज, दत्ताजीराव कदम कॉलेज, इचलकरंजी. **शास्त्रीय तालवाद्य** - किसनवीर महाविद्यालय, महावीर महाविद्यालय, सरदार बाबासाहेब माने महाविद्यालय रहिमतपूर.

**स्थळचित्रण** - शिवराज महाविद्यालय गडहिंग्लज, मुधोजी महाविद्यालय, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी. **कोलाज** - शिवशाहू महाविद्यालय सरुड, मुधोजी महाविद्यालय, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय वारणानगर, विवेकानंद कॉलेज. **रांगोळी** - विवेकानंद कॉलेज, डेक्कन कॉलेज कोल्हापूर, डी. के. एसी कॉलेज इचलकरंजी.



सातारा येथील धनंजयराव गाडगीळ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीने भरत नाट्यम् सादर केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 SEP 2019
लोकमत

राबिया होउयाला; विद्यापीठात व्याख्यान

# ॲलिलोपॅथीबाबत जागृतीची गरज

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : कृत्रिम रसायनांच्या अतिवापरामुळे होत असलेल्या वातावरणातील प्रदूषणास मानवच जबाबदार आहे. या परिस्थितीमध्ये विद्यार्थी, संशोधक आणि शिक्षकांमध्ये ॲलिलोपॅथिविषयक सार्वत्रिक जागृती करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन ट्यूनिशिया येथील सौजे विद्यापीठाच्या प्रा. डॉ. राबिया होउयाला यांनी शुक्रवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागात केंद्रीय मनुष्यबळ मंत्रालयाच्या ग्लोबल इनिशिएटिव्ह फॉर ॲकॅडेमिक नेटवर्क (ग्यान) या प्रकल्पांतर्गत डॉ. होउयाला यांची व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यांचा विषय 'वनस्पतींच्या परस्परांतील संबंधाचा शाश्वत शेतीमध्ये वापर' असा आहे. गुरुवारी (दि. ३)पर्यंत चालणाऱ्या या व्याख्यानमालेचे उद्घाटन शुक्रवारी नीलांबरी सभागृहात झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते. डॉ. राबिया होउयाला म्हणाल्या, 'ॲलिलोपॅथिमध्ये पर्यावरणीय बदलांमुळे एका वनस्पतीकडून दुसऱ्या वनस्पतीवर किंवा एका सजिवाकडून दुसऱ्या सजीवावर होणाऱ्या जैवरासायनिक अभिक्रियांचा, परिणामांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे ॲलिलोपॅथी. आजच्या काळात सातत्याने असे बदल होत आहेत व मानवी हस्तक्षेपामुळे ते अधिक गतिमान पद्धतीने होत आहेत. यामध्ये सकारात्मक परिणामांपेक्षा दुष्परिणामांचे प्रमाण अधिक दिसते आहे. वनस्पतीशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. वर्षा जाधव, प्रा. एस. आर. यादव, जी. बी. दीक्षित, पी. डी. चव्हाण, बी. ए. कारदगे उपस्थित होते. डॉ. डी. के. गायकवाड यांनी स्वागत केले.



## विचारांची देवाणघेवाण

डॉ. नांदवडेकर म्हणाले, 'ग्यान'सारखे उपक्रम हे आंतरराष्ट्रीय विद्यापीठीय समुदायांमध्ये विचारांची देवाणघेवाण करण्याच्या दृष्टीने अतिशय कळीची भूमिका बजावत आहेत. त्यातून ज्ञानवर्धनाबरोबरच अनेक नवनव्या गोष्टी स्थानिक विद्यार्थ्यांना, शिक्षकांना माहिती होतात.

पुढारी

# एमबीए अभ्यासक्रमाच्या रिक्त जागांसाठी प्रवेश

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राअंतर्गत एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी ६३ जागा रिक्त असल्याने प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

दूरशिक्षण केंद्राअंतर्गत बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), पी.जी. डिप्लोमा इन ट्रान्सलेशन या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संलग्नित महाविद्यालयांतील ८१ अभ्यास केंद्रांवर ३० सप्टेंबरपर्यंत सुरू आहे. ज्या विद्यार्थ्यांनी असोसिएशन ऑफ इंडियन मॅनेजमेंट स्कूलची परीक्षा व महा-सीईटी दिली आहे. परंतु, नियमित प्रवेश मिळाला नाही, अशा विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी दूरस्थ पद्धतीने प्रवेश दिला जाणार आहे.

संक्षिप्त




कोल्हापूर : राजारामपुरी पोलिस ठाण्याला भेट देण्यासाठी आलेले एलएलएमचे विद्यार्थी. (छाया : नाज ट्रेनर)

## एलएलएमच्या विद्यार्थ्यांची राजारामपुरी पोलिस ठाण्याला भेट

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठातील एलएलएम विभागातील विद्यार्थ्यांनी अभ्यास दौऱ्यांतर्गत राजारामपुरी पोलिस ठाण्याला भेट दिली. पोलिस ठाण्यातील कामकाजाची माहिती विद्यार्थ्यांनी घेतली. पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्यांनीही विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. पोलिस निरीक्षक नवनाथ घोगरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम झाला. यावेळी चेतन घाटगे, डॉ. विवेक धुपडाळे, डॉ. चंद्रानी बागडी, उपनिरीक्षक अभिजित गुरव, अर्पिता जोंधळे आदी उपस्थित होत्या.

# तृतीयपंथीयांच्या हक्कांसाठी विद्यापीठ कटिबद्ध

## प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची ग्वाही

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
समाजातील प्रत्येक घटकाला शैक्षणिक सेवा पुरवणे ही विद्यापीठाची जबाबदारी आहे. शिक्षणासह सामाजिक हक्कांपासून तृतीयपंथीय नागरिक वंचित राहणार नाहीत, यासाठी प्रयत्न करण्यास शिवाजी विद्यापीठ कटिबद्ध आहे, अशी ग्वाही शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली. विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे तृतीयपंथी व्यक्तींसाठी आयोजित केलेल्या कौशल्य विकास कार्यशाळेमध्ये ते बोलत होते.

डॉ. शिर्के म्हणाले, अशी कार्यशाळा विद्यापीठात प्रथमच होत असून तृतीयपंथी व्यक्तींमधील कौशल्य विकासासाठी सुरू झालेला हा उपक्रम या पुढील काळातही निरंतर आणि व्यापक स्वरूपात विद्यापीठ राबवेल. या लोकांना सर्वांनी समतेची आणि समानतेची वागणूक दिली पाहिजे. ही आपली सार्वजनिक जबाबदारी आहे. यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. तृतीयपंथीय लोकांच्या समस्यांचे स्वरूप लक्षात येण्यासाठी विविध संशोधन प्रकल्पही हाती घेण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. विद्यापीठाच्या बृहत् आराखड्यामध्ये तृतीयपंथी व्यक्तींसाठी विविध उपक्रम राबवण्यासाठीही तरतूद करण्यात आल्याची माहिती त्यांनी या प्रसंगी दिली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे तृतीयपंथीयांसाठी आयोजित कौशल्य विकास कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत विशाल पिंजानी, मयुरी आळवेकर, डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव.**

मयुरी आळवेकर म्हणाल्या, तृतीयपंथीयांचे प्रश्न विद्यापीठ प्रशासन समजावून घेत आहे आणि त्यावर उपाययोजना करण्यासाठी, दिलासा देण्यासाठी विद्यापीठ पुढे आले आहे, ही अत्यंत स्तुत्य बाब आहे. एक माणूस म्हणून जगण्याचा हक्क विद्यापीठाच्या माध्यमातून तृतीयपंथीयांना मिळेल, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

या कार्यशाळेत दिवसभरात कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह आंतरराष्ट्रीय व्याख्याते कौस्तुभ बंकापुरे, डॉ. विद्यानंद खंडागळे, डॉ. कृष्णा पाटील, पद्मश्री मादनाईक, डॉ. ए. एम. गुरव यांनी विविध विषयांवर कौशल्य प्रशिक्षण दिले. कार्यशाळेसाठी कोल्हापूर परिसरातील बहुसंख्य तृतीयपंथी नागरिक उपस्थित होते. यावेळी अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, कौशल्य विकास अधिकारी महेश चव्हाण, विशाल पिंजानी उपस्थित होते.

# ॲलिलोपॅथीविषयी जागृती आवश्यक

## डॉ. राबिया होउयाला

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

कृत्रिम रसायनांच्या अतिवापरामुळे होत असलेल्या वातावरणातील प्रदूषणास मानवच जबाबदार आहे. या परिस्थितीमध्ये विद्यार्थी, संशोधक आणि शिक्षकांमध्ये ॲलिलोपॅथीविषयक सार्वत्रिक जागृती करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन ट्युनिशिया येथील सौजे विद्यापीठाच्या प्राध्यापक व ट्युनिशियन असोसिएशन फॉर सस्टेनेबल ॲग्रीकल्चर या संस्थेच्या अध्यक्षा डॉ. राबिया होउयाला यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतिशास्त्र अधिविभागात केंद्रीय मनुष्यबळ मंत्रालयाच्या ग्लोबल इनिशिएटिव्ह फॉर ॲकॅडेमिक नेटवर्क (ग्यान) या प्रकल्पांतर्गत डॉ. होउयाला



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानमालेत बोलताना ट्युनिशियाच्या डॉ. राबिया होउयाला.**

यांच्या 'वनस्पतींच्या परस्परातील संबंधाचा शाश्वत शेतीमध्ये वापर' या विषयावरील व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. ३ ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या व्याख्यानमालेचे उद्घाटन नीलांबरी सभागृहात झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते.

डॉ. राबिया होउयाला यांनी हिंदीमधून उपस्थितांना अभिवादन केले. त्या म्हणाल्या, ॲलिलोपॅथीमध्ये पर्यावरणीय बदलांमुळे एका वनस्पतीकडून दुसऱ्या वनस्पतीवर किंवा एका सजीवाकडून दुसऱ्या सजीवावर होणाऱ्या जैवरासायनिक अभिक्रियांचा, परिणामांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे ॲलिलोपॅथी. आजच्या काळात सातत्याने असे बदल होत आहेत आणि मानवी हस्तक्षेपामुळे ते अधिक गतिमान पद्धतीने होत आहेत. यामध्ये सकारात्मक परिणामांपेक्षा दुष्परिणामांचे प्रमाण अधिक दिसते आहे. ते रोखण्यासाठी या शास्त्राच्या अभ्यासाची मोठी गरज आहे.

कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, 'ग्यान'सारखे उपक्रम हे आंतरराष्ट्रीय विद्यापीठीय समुदायांमध्ये विचारांची देवाणघेवाण करण्याच्या दृष्टीने अतिशय कळीची भूमिका बजावत आहेत. त्यातून ज्ञानवर्धनाबरोबरच अनेक नवनव्या गोष्टी स्थानिक विद्यार्थ्यांना, शिक्षकांना माहिती होतात. त्यांचे उपयोजन करण्यासाठी तज्ज्ञांसमवेत चर्चा करून त्यांचे मार्गदर्शन मिळविता येते.

वनस्पतिशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. वर्षा जाधव, प्रा. एस. आर. यादव, प्रा. जी. बी. दीक्षित, प्रा. पी. डी. चव्हाण, प्रा. बी. ए. कारदगे आदी उपस्थित होते. डॉ. डी. के. गायकवाड यांनी स्वागत केले. प्रा. एस. एस. कांबळे यांनी परिचय करून दिला. प्रा. एन. बी. गायकवाड यांनी आभार मानले.